# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

# दिनांक - 20/08/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

---

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवा )
पोलीस उप अधी.(मुर )
पोलीस अधीक्षक यवतमा करीता

**प्रति,**

प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल वतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या म ाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - M वरती पाठवावे.

# भाग ५ - शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

क्र:डिपी/३१-बी-२/पो.उप.नि- घोगर/अंआ/ 6864 २०२०/यवतमाळ दि. 20 AUG 2020

वाचा :- या कार्यालयाचे का.दा.नो क्र. पोअय/वि.चौ/कसुरी/राजाभाऊ घागरे/२०२०-५०००
दिनांक २४/०७/२०२०

<u>अंतिम आदेश</u>

<u>कसूरदार :-</u> पो.उप.नि/राजाभाऊ घोगरे, नेमणुक पो.स्टे. घाटंजी

<u>कसुरी :-</u>

पो.उप.नि/राजाभाऊ घोगरे आपण पो.स्टे. घाटंजी, येथे नेमणुकीस आहात आपली मागील तिन महिण्यातील लॉकडाऊन कालावधी मधील कामगीरी पाहता आपण ग्राम साखरा येथे अवैध दारु वाहन पकडुन सोडुन दिले, असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. तसेच आपले घाटंजी गावातील गुंड व समाजकंटक लोकांसोबत जास्त संबंध निर्माण झाले असुन, याबाबत लोकांकडुन वारंवार तोंडी तक्रारी येत आहेत. व सदरचे कृत्य हे आपले पदास अशोभनिय व बेजबाबदारपणाचे असल्याचे दिसुन येते.

काही दिवसांपुर्वी प्रशांत धांदे, या व्यक्तीने पोलीस स्टेशन घाटंजी चे विरोधामध्ये अवैध धंदे सुरु असल्याबाबत तसेच पो.स्टे. मध्ये केलेल्या बांधकामाचे विरोधात बातमी लावली होती. तेव्हा आपण प्रकाश धांदे, या इसमासोबत पांढरकवडा येथे दिनांक १०/०६/२०२० रोजी बैठक घेतली असल्याचे, माहिती प्राप्त झाली आहे. यावरुन आपण पोलीस विभागाचे विरोधात तक्रार करणारे इसमासोबत अशा प्रकारची बैठक करणे हे संशयास्पद असुन, आपले अश्या कृत्यावरुन आपल्या विश्वासहर्तेप्रती प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. तसेच मागील तिन महिन्यामध्ये आपण पोलीस स्टेशन बदलुन आले तेव्हापासुन, वारंवार पोलीसाबद्दल नकारार्थी भावना व आपणा विरुध्द तोंडी तक्रारी प्राप्त होत आहे.

आपले वर्तन पोलीस अधिकारी पदास अशोभनीय व बेजबाबदारपणाचे असुन, आपल्या अशा कृत्यामुळे पोलीस दलाची प्रतिमा मलीन होत आहे. आपल्या अशाच प्रकारच्या कृत्यामुळे भविष्यात एखादा अनुचित प्रकारची घटना घडुन, पोलीस विभागाची प्रतिमा मलिन होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त प्रकरणी कर्तव्यामध्ये हलगर्जीपणा, निष्काळजीपणा, बेजबाबदारपणाचे कसुरी बाबत आपणांस दिनांक २४/०७/२०२० रोजी " **१ (एक) वर्ष वेतनवाढ स्थगिती** " (अपरिणामकारक) या **प्रस्तावित शिक्षेची** कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. आपण का.दा.नो स्विकारली व आपले स्पष्टिकरण सादर केले आपले स्पष्टिकरण हे समाधानकारक नसल्याने का.दा.नो. मधील प्रस्तावित शिक्षा कायम ठेवुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

मी पोलीस अधिक्षक यवतमाळ याव्दारे **पो.उप.नि/राजाभाऊ घोगरे,** यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत **" १ (एक) वर्ष वेतनवाढ स्थगिती "** (अपरिणामकारक) ची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसांचे आंत मा.विशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती परीक्षेत्र अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

(एम.राज कुमार)

[redacted]

क्र:डिपी/३१-बी-२/स.पो.नि.इंगळे+१/अंआ/6858 २०२०/यवतमाळ दि. 20 AUG 2020

वाचा :- या कार्यालयाचे का.दा.नो क्र. डीपी/३१-बी-२/स.पो.नि-इंगळे+१/कसुरी/४८९७ यवतमाळ दि. २२/०६/२०२०

## अंतिम आदेश

कसूरदार :- १. स.पो.नि/योगेश इंगळे नेमणुक पो.स्टे. नेर
२. पो.उप.नि/धिरज राऊत तत्का. नेमणुक पो.स्टे. नेर

कसुरी :-

**१. स.पो.नि/योगेश इंगळे २.पो.उप.नि/धिरज राऊत**, आपण केलेल्या कार्यवाही बाबत दि. २२/०१/२०२० रोजी ठाणेदार पो.स्टे. नेर यांनी दि. २१/०१/२०२० रोजी दाखल झालेल्या गुन्हयांची फाईल पाहीली त्यामध्ये असलेल्या अपराध क्रमांक ४४/२०२० कलम १२ (अ) मुजुका चे अवलोकन केल असता, प्रथम खबरीमध्ये फिर्यादी राऊत असल्याने, दिसुन आले. परंतु प्रथम खबरी सोबत जोडलेल्या पंचनामा पाहीला असता, पंचनाम्याची सूरवात स.पो.नि/योगेश इंगळे यांचे नावाने आहे. पंचनाम्यावर पंचाचा नावाचा उल्लेख आहे. पंचनामा कार्यवाही पंचासमक्ष मोकयावर करुन सहया असे लिहले आहे. परंतु पंचाच्या सहया नाहीत. व समक्ष म्हणुन पंचनामा करणा-या सक्षम अधिकारी यांची सही नाही. त्यामुळे पंचनामा नेमका कोणी केला. याचा बोध होत नाही. प्रथम खबरीमध्ये ५०३ रु. जप्त केले असे नमुद आहे. परंतु पंचनाम्यामध्ये मराठीत रु. ८३० असे दिसुन येते. एफ.आय.आर मध्ये स्थानिक पंच घेतल्याचे नमुद आहे. परंतु पंचनाम्या मध्ये लिहलेले दोन्ही पंच नामे विठ्ठल सुभाष राऊत व शुभम संजय बबुतकार, हे दोन्ही राहणारे नेर चे आहे. सदर कागपत्रामुळे जप्ती पंचनामा कार्यवाही बाबत संशय आल्याने, ठाणेदार पो.स्टे. नेर यांनी त्यांची पो.डा. सा.ना. क्रमांक ३९/२० दि. २२/०१/२०२० चे २१/३६ वाजता स्टे.डा.ला नोंद घेतली. तसेच या बाबत सातेफळ येथील काही प्रतिष्ठीत लोकांना विचारले असता, आपण दि.२१/०१/२०२० रोजी जुगार कायद्याअंतर्गत चुकीच्या पध्दतीने कार्यवाही केल्याचे त्यांनी सांगितले. त्यावरुन कार्यवाही बाबत शहानिशा करण्याच्या दृष्टीने ठाणेदार नेर यांनी प्रत्यक्षदर्शी साक्षदार यांचे जाबजबाब नोंदविले.

सदर कार्यवाहीमध्ये आपण हजर असतांना तसेच आपणास वारंवार पो.स्टे. हद्दीतील अवैद्य दारु जुगार मटका या वर कार्यवाही करण्या करीता वेळोवेळी कायदेशीर आदेश दिले असतांना, व कायद्याचे परीपुर्ण ज्ञान आपणास असतांना, तुम्ही सदरच्या कार्यवाही मध्ये अंदाजे ३०/०३५ हजार रुपये जप्त करुन गुन्हयात गाडया जप्त न करण्यासाठी वेगळे ४५०००/- रुपये घेतल्याचे समजते. यातील जप्त केलेली पुर्ण रक्कम गुन्हयात दाखवली असती, मिळालेले सर्व लोकांना आरोपी बनविले असते, तर सातेफळ बिट मध्ये वरळी मटका व्यवसाय समुळ नष्ट होवुन एक दर्जेदार कार्यवाही झाली असती , परंतु आपण तसे न करता फक्त ५३० रुपये जप्त दाखवुन उर्वरीत रक्कम आपसात वाटुन घेतली. सदरचे कृत्य हे अतिशय गंभीर, बेकायदेशीर असुन पोलीसांची प्रतिमा जनमानसात मलीन करणारे आहे. तसेच गुन्हेगारी स्वरुपाचे आहे. आपण स्वता:च्या फायद्यासाठी पंचनामा व स्वता:च्या फायद्यासाठी जुगार साहित्य जप्त न केल्याचे, प्रथमदर्शनी दिसुन येते.

उपरोक्त, प्रकरणी कर्तव्यातील हलगर्जीपणा व बेजबाबदारपणा केलेल्या कसुरीबाबत आपणास दिनांक २२/०६/२०२० रोजी "२ (दोन) वर्षे वेतनवाढ स्थगिती" (अपरिणामकारक) या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. आपण कादानो स्विकारुन आपले स्पष्टिकरण सादर केले आपले स्पष्टिकरण हे अंशत: समाधानकारक वाटल्याने, तसेच अशा प्रकारची पुनरावृत्ती पुन्हा होणार नाही. या करीता शिक्षा कमी करुन प्रस्तावित शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक यवतमाळ याव्दारे १.स.पो.नि/योगेश इंगळे २.पो.उप.नि/धिरज राऊत, यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत रु. ३०००/- (तिन हजार) आर्थिक दंडाची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसांचे आंत मा.विशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती परीक्षेत्र अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक ,यवतमाळ

प्रति,

१. स.पो.नि/योगेश इंगळे , नेमणुक पो.स्टे. नेर
२.पो.उप.नि/धिरज राऊत, नेमणुक पो.स्टे. नेर

मार्फत :- ठाणेदार पो.स्टे. नेर

२/- उपरोक्त आदेशाची मुळ प्रत संबंधीतांना अदा करुन दुय्यम प्रतिवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेऊन ती दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करावी.

प्रत :- वेतन लिपीक-२/अधिकारी आस्थापना लिपीक/डिपीजी लिपीक यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव.